महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८ सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०
संपर्क क्रमांक (०२०) २४४७ ६९३८ E mail: evaluationdept@maa.ac.in

---

# Question Bank

Standard :- 12th

Subject :- सहकार (५३)

**सूचना**

१. फक्त विद्यार्थ्यांना प्रश्नप्रकारांचा सराव करून देण्यासाठीच

२. सदर प्रश्नसंचातील प्रश्न बोर्डाच्या प्रश्नपत्रिकेत येतीलच असे नाही याची नोंद घ्यावी.

## 12वी सहकार (53) प्रश्नपेढी

**प्रश्न 1. अ) खालील दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व पुन्हा लिहा.**

1) संचालक हे सभासदांचे ---------- असतात.

अ) सावकार ब) प्रतिनिधी क) नोकर

2) भाग प्रमाणपत्रावर दुसऱ्या अथवा त्यापुढील क्रमांकावर नाव असलेली व्यक्ती म्हणजे ---------- सभासद होय.

अ) क्रियाशील ब) नाममात्र क) सहयोगी

3) सभासदत्वासाठी सर्व अटींची पूर्तता करणाऱ्या सभासदास ---------- म्हणतात.

अ) क्रियाशील ब) सहयोगी क) नाममात्र

4) केवळ प्रवेश फी भरून दाखल झालेली व्यक्ती ---------- सभासद होय.

अ) सहयोगी ब) क्रियाशील क) नाममात्र

5) वयाची ---------- वर्षे पूर्ण झालेली व्यक्ती सभासदत्वास पात्र असते.

अ) 18 ब) 15 क) 21

6) सभासद हे सहकारी संस्थेचे ---------- असतात.

अ) सावकार ब) सेवक क) मालक

7) सहकारी संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची संख्या ठरविण्याचा अधिकार ---------- ला असतो.

अ) सचिव ब) अध्यक्ष क) निबंधक

8) भारतातील पहिला सहकारी कायदा ---------- साली संमत करण्यात आला.

अ) 1912 ब) 1925 क) 1904

9) नोंदणी अर्जासोबत उपविधीच्या ---------- प्रती जोडाव्या लागतात.

अ) चार ब) दोन क) सहा

10) सहकारी संस्थांवर देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ---------- नियुक्ती केलेली आहे.

अ) प्रवर्तकाची  ब) सहकार आयुक्त व निबंधकाची  क) सचिवाची

11) सहकारी संस्थांकरिता ---------- कडून सहकार आयुक्त व निबंधकाची नेमणूक करण्यात येते.

अ) केंद्रशासन  ब) राज्यशासन  क) स्थानिक स्वराज्य संस्था

12) सहकार आयुक्त व निबंधक ---------- स्तरावर कार्य करतात.

अ) तालुका  ब) राज्य  क) जिल्हा

13) सहकार आयुक्त व निबंधक हा ---------- प्रशासकीय अधिकारी असावा.

अ) मवाळ  ब) अकार्यक्षम  क) कठोर

14) साहाय्यक निबंधकाची नेमणूक ---------- स्तरावर होते.

अ) तालुका  ब) विभागीय  क) राज्य

15) सभेमध्ये चर्चा करायच्या यादीला ---------- असे म्हणतात.

अ) सूचना  ब) कार्यक्रमपत्रिका  क) इतिवृत्त

16) महाराष्ट्रातील पहिला सहकारी संस्था कायदा ---------- यावर्षी संमत झाला.

अ) 1904  ब) 1912  क) 1960

17) सहकारी संस्थेचे भांडवल उभारणीचे प्रमुख वित्तीय साधन ---------- होय.

अ) भाग भांडवल  ब) प्रवेश शुल्क  क) अनुदान व मदत

18) सहकारी कायद्यानुसार  सहकारी संस्थेच्या निव्वळ नफ्यातील ---------- टक्के रक्कम राखीव निधीत जमा केली पाहिजे.

अ) 12   ब) 15   क) 25

19) भारतातील दुसरा सहकारी कायदा ---------- यावर्षी संमत करण्यात आला.

अ) 1904   ब) 1912   क) 1960

20) भांडवल उभारणीचे ---------- हे बाह्य साधन आहे.

अ) भाग   ब) कर्जरोखे   क) राखीव निधी

21) सहकारी संस्थेचे आर्थिक वर्ष संपल्यानंतर ---------- सर्वसाधारण सभा आयोजित केली जाते.

अ) पहिली   ब) अधिमंडळाची वार्षिक   क) अधिमंडळाची विशेष

22) सभेतील कामकाजाची नोंद ---------- ठेवली जाते.

अ) इतिवृत्त पुस्तकात   ब) कार्यक्रमपत्रिकेत   क) सभासद नोंदणी पुस्तकात

23) सहकारी संस्थेचे आर्थिक वर्ष ---------- रोजी संपते.

अ) 30 जून   ब) 31 मार्च   क) 31 डिसेंबर

24) केवळ विशिष्ट हेतूसाठी जी सभा बोलविली जाते तिला ---------- सभा असे म्हणतात.

अ) पहिली सर्वसाधारण   ब) अधिमंडळाची विशेष   क) अधिमंडळाची वार्षिक

25) पहिली सर्व साधारण सभा ---------- बोलवितो.

अ) अध्यक्ष   ब) प्रवर्तक   क) निबंधक

26) दोष दुरूस्ती अहवालात दर्शविलेले दोष संस्थेने --------- महिन्यात दुरूस्त केले पाहिजेत.

अ) दोन ब) तीन क) सहा

27) दोष दुरूस्ती अहवाल हा नमुना ---------- मध्ये असतो

अ) ‘ न ‘ ब) ‘ अ ‘ क) ‘ ओ ‘

28) सभासद नोंदणी पुस्तक नमुना ----------प्रमाणे ठेवणे आवश्यक असते.

अ) ‘ ओ ‘ ब) ‘आय ‘ क) ‘ न ‘

29) भारतातील पहिली नागरी सहकारी बँक ---------- यावर्षी स्थापन झाली.

अ) 1849 ब) 1879 क) 1889

30) नागरी सहकारी बँक ---------- भागात कार्य करते.

अ) शहरी ब) ग्रामीण क) जिल्हा

31) बॅकिंग नियमन कायदा 1949 नागरी सहकारी बँकांना सन ---------- पासून लागू करण्यात आला.

अ) 1965 ब) 1966 क) 1967

32) नागरी सहकारी बँका या ---------- बँकेच्या सभासद असतात.

अ) प्राथमिक सहकारी ब) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक क) ग्रामीण सहकारी

33) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कार्यक्षेत्र ---------- मर्यादित असते.

अ) राज्यापुरते ब) जिल्ह्यापुरते क) तालुक्यापुरते

34) भारतात सहकारी पतपुरवठ्याची रचना ---------- आहे.

अ) त्रिस्तरीय ब) चतुःस्तरीय क) द्विस्तरीय

35) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही राज्य सहकारी बँक आणि ---------- यांच्यात दुवा म्हणून कार्य करते.

अ) प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था ब) पतपेढ्या क) ग्रामीण बँका

36) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका ---------- बॅकेच्या सभासद असतात.

अ) नागरी सहकारी ब) राज्य सहकारी क) ग्रामीण सहकारी

37) राज्य सहकारी बँक ---------- पातळीवर कार्य करते.

अ) तालुका ब) जिल्हा क) राज्य

38) महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे मुख्य कार्यालय ---------- येथे आहे.

अ) पुणे ब) मुंबई क) नाशिक

39) सहकार शिक्षण व प्रशिक्षणातून ---------- नेतृत्व निर्माण व्हावे ही अपेक्षा असते.

अ) कुशल ब) अकुशल क) स्वार्थी

40) सहकारी संस्थांची स्थापना ---------- साधन सामुग्री असणाऱ्या व्यक्तींकडून केली जाते.

अ) अमर्यादित ब) मर्यादित क) अनावश्यक

41) सहकारी संस्थांच्या अकार्यक्षमतेमुळे ---------- कमी झाली आहे.

अ) संख्या ब) आवड क) विश्वासार्हता

42) बहुराष्ट्रीय कंपन्यांचे व्यवस्थापन ---------- व्यवस्थापकामार्फत केले जाते.

अ) अशिक्षित ब) तज्ज्ञ क) अकुशल

ब) **योग्य जोड्या जुळवा.**

1)

| 'अ' **गट** | 'ब' **गट** |
|---|---|
| अ) क्रियाशील सभासद | 1) सभासदांचे प्रतिनिधी |
| ब) सहयोगी सभासद | 2) मतदानाचा अधिकार असतो. |
| क) संचालक | 3) मतदानाचा अधिकार नसतो |
| ड) सचिव | 4) 1912 |
| इ) महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा | 5) संयुक्तपणे भाग धारण करतो. |
| | 6) केवळ प्रवेश शुल्क भरतो |
| | 7) संस्थेचे सावकार |
| | 8) सहकारी संस्थांचा निबंधक. |
| | 9) सहकारी संस्थेचा सेवक |
| | 10) 1960 |

2)

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| अ) सहकार आयुक्त व निबंधकाचे कार्यालय | 1) मुंबई |
| ब) जिल्हा उपनिबंधक | 2) दर वर्षी बोलविली जाते |
| क) सहकारी क्षेत्राचे नेतृत्व करणे | 3) राज्य स्तर |
| ड) भारतातील पहिला सहकारी संस्था कायदा | 4) 1904 |
| इ) अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा | 5) विकासात्मक कार्ये |
| | 6) जिल्हा स्तर |
| | 7) नियंत्रणात्मक कार्ये |
| | 8) पुणे |
| | 9) 1932 |
| | 10) महिन्यातून एकदा बोलविली जाते |

3)

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| अ) ऋणपरीशोधन अधिकारी | 1) राखीव निधी |
| ब) भाग | 2) चालू ठेव |
| क) कर्जरोखे | 3) लाभांश |
| ड) सहकारी संस्थेची संरक्षक भिंत | 4) व्याज |
| इ) इतिवृत्त | 5) अधिमंडळाची विशेष सभा |
| | 6) अंतिम सभा |
| | 7) विकास निधी |

8) घसारा

9) नोंदणी प्रमाणपत्र

10) सभेतील निर्णयांचा कायदेशीर पुरावा

4) ‘अ’ गट

“ब” गट

| ‘अ’ गट | “ब” गट |
|---|---|
| अ) अध्यक्ष | 1) संस्थेचे अस्तित्व |
| ब) चिटणीस | 2) सभेतील विषय सूची |
| क) गणपूर्ती | 3) इतिवृत्त लिहिण्याची जबाबदारी |
| ड) कार्यक्रमपत्रिका | 4) नोंदणी प्रमाणपत्र |
| इ) अंतिम सभा | 5) सहकारी संस्थेच्या स्थापनेसाठी किमान सभासद संख्या |
| | 6) सभेसाठी किमान अनावश्यक संख्या |
| | 7) सभेवर नियंत्रण |
| | 8) राखीव निधी |
| | 9) सभेसाठी किमान आवश्यक संख्या |
| | 10) संस्थेचा शेवट |

5)

| ‘अ’ गट | ‘ब’ गट |
| --- | --- |
| अ) अधिविकर्ष सवलत | 1) नमुना ‘ आय ‘ |
| ब) महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा | 2) मूदत ठेव |
| क) अधिमंडळाची विशेष सभा | 3) प्रवर्तकाने बोलविलेली सभा |
| ड) भाग भांडवल | 4) अंतर्गत साधन |
| इ) सभासद नोंदणी पुस्तक | 5) सभासदांच्या मागणीवरून |
| | 6) बाह्य साधन |
| | 7) 1904 |
| | 8) 1960 |
| | 9) नमुना ‘ओ’ |
| | 10) चालू ठेव |

6)

| ‘अ’ गट | ‘ब’ गट |
| --- | --- |
| अ) अंकेक्षक | 1) कर्जरोखे |
| ब) बँकिग नियमन कायदा | 2) 24 तास पैसे भरणे व काढणे |
| क) नागरी सहकारी बँक | 3) हिशेबतपासणी करणे |
| ड) ए.टी.एम. सुविधा | 4) ग्रामीण क्षेत्र |

इ) स्वतःचा निधी

5) 1949

6) भागभांडवल

7) 12 तास पैसे भरणे व काढणे

8) 1946

9) शहरी क्षेत्र

10) हिशेब लेखन करणे

7) 'अ ' गट — ' ब ' गट

| 'अ ' गट | ' ब ' गट |
|---|---|
| अ) सुरक्षित खण | 1) अकार्यक्षम व्यवस्थापन |
| ब) मॅक्लेगन समिती | 2) लाभांश |
| क) प्रशिक्षित कर्मचारी वर्ग | 3) गौण वस्तू ठेवणे |
| ड) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक | 4) 1915 |
| इ) ठेवी | 5) राज्यस्तर |
| | 6) मौल्यवान वस्तू ठेवणे |
| | 7) जिल्हास्तर |
| | 8) व्याज |
| | 9) 1951 |
| | 10) कार्यक्षम व्यवस्थापन |

8) ‘अ ‘ गट — ‘ ब ‘ गट

| ‘अ ‘ गट | ‘ ब ‘ गट |
|---|---|
| अ) सहकारी पतपुरवठा रचना | 1) चतु:स्तरीय |
| ब) शिखर बँक | 2) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक |
| क) राज्य सहकारी बँकेचे मुख्य कार्यालय | 3) पुणे |
| ड) मॅक्लेगन समितीची स्थापना | 4) त्रिस्तरीय |
| इ) राज्य सहकारी बँकेचे सभासद | 5) 1914 |
| | 6) राज्यस्तर |
| | 7) मुंबई |
| | 8) जिल्हास्तर |
| | 9) 1951 |
| | 10) नागरी सहकारी बँका |

9) ‘ अ ‘ गट — ‘ब’ गट

| ‘ अ ‘ गट | ‘ब’ गट |
|---|---|
| अ) सहकार नियोजन समिती | 1) 1954 |
| ब) बहुराष्ट्रीय कंपन्या | 2) 1946 |
| क) कर्ज वसुली समस्या | 3) लहान प्रमाणात उत्पादन |
| ड) ग्राहक | 4) स्पर्धायुक्त बाजारपेठेचा राजा |
| | 5) अपात्र व्यक्तींना कर्ज |
| | 6) प्रचंड प्रमाणात उत्पादन |
| | 7) दुय्यम स्थान |
| | 8) उत्पादक कर्ज |

**क) खालील विधानांसाठी एक शब्द / शब्दसमूह लिहा.**

1. भाग प्रमाणपत्रावर प्रथम क्रमांकावर नाव असणारा सभासद.
2. केवळ प्रवेश फी भरून सभासदत्व मिळणारी व्यक्ती.
3. क्रियाशील सभासदाच्या गैरहजेरीत सभेला उपस्थित राहू शकणारा सभासद.
4. सभासदांनी दैनंदिन कामकाजासाठी निवडून दिलेले प्रतिनिधी.
5. अध्यक्षाच्या गैरहजेरीत सभेचे कामकाज चालविणारी व्यक्ती.
6. सहकारी संस्थांची नोंदणी करणारा अधिकारी.
7. सहकारी संस्थांचे जिल्हा स्तरावर नियंत्रण करणारा प्रमुख नियंत्रक अधिकारी.
8. विभागीय स्तरावरील सहकारी संस्थांचे नियंत्रण करणारा अधिकारी.
9. सहकारी संस्थेच्या उपविधीस मान्यता देणारा अधिकारी.
10. सहकारी संस्थेची संरक्षक भिंत.
11. सभेच्या कामकाजाची नोंद ठेवणारे पुस्तक.
12. सभेमध्ये चर्चिल्या जाणाऱ्या विषयांची यादी.
13. विशिष्ट कालावधीसाठी ठेवण्यात येणारी ठेव.
14. ज्या ठेवीत दैनंदिन व्यवहारात कितीही वेळा रक्कम ठेवता व काढता येते.
15. सभेत मतदानाच्या वेळी अध्यक्षांना असणारा विशेषाधिकार.
16. पहिली सर्वसाधारण अधिमंडळाची सभा बोलविणारी व्यक्ती.
17. विशिष्ट उद्देशासाठी तातडीने बोलविण्यात आलेली सभा.
18. सभेच्या वैधानिकतेसाठी सभासदांची किमान उपस्थिती.
19. भारतात पहिला सहकारी कायदा संमत झाला ते वर्ष.
20. संस्थेच्या दरवर्षीच्या निव्वळ नफ्यातून बाजूला काढून ठेवलेली रक्कम.
21. सहकारी संस्थेचे जमाखर्च तपासणारी व्यक्ती.
22. सहकारी संस्थेला कायद्यानुसार दरवर्षी आपले हिशेब तपासून घेणे बंधनकारक असते अशी हिशेबतपासणी.
23. सहकारी संस्थेमध्ये सातत्याने वर्षभर चालणारी हिशेबतपासणी.
24. शहरी भागातील पगारदार वर्ग,लहान व्यावसायिक, कारागिरांना कर्जपुरवठा करणारी बँक.
25. दागदागिने व मौल्यवान वस्तू सुरक्षितरीत्या ठेवण्यासाठी नागरी सहकारी बँकेने पुरविलेली सुविधा.
26. नागरी सहकारी बँकेने ग्राहकांना 24 तास पैसे भरणे व काढण्यासाठी उपलब्ध करून दिलेली सुविधा.
27. जिल्हा पातळीवर कार्य करणारी सहकारी बँक.

28. राज्य सहकारी बँक आणि प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था यांना जोडणारा दुवा.
29. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने दिलेल्या कर्जाचे वसूल न होणारे हप्ते.
30. सहकारी पतपुरवठ्याच्या रचनेतील राज्यातील सर्वोच्च बँक.
31. राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची बँक.
32. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांवर नियंत्रण व नियमन करणारी बँक.
33. सहकारी संस्थेशी संबंधित घटकांना सुजाण व शिक्षित करण्याचा मार्ग.
34. स्पर्धात्मक बाजारपेठेतील राजा.
35. जगातील अनेक देशात उत्पादन,विक्री आणि व्यवहार करणारी कंपनी.
36. देशातील आर्थिक संकटाचे निवारण करण्यासाठी जुलै 1991 मध्ये स्विकारण्यात आलेले धोरण.

ड) **खालील विधाने चूक वा बरोबर** ते **लिहा.**

1. सहकारी संस्थेचे सभासद संचालकांची निवड करतात.
2. क्रियाशील सभासदांना लाभांश मिळविण्याचा अधिकार नसतो.
3. सभासदांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या समूहाला संचालक मंडळ म्हणतात.
4. संचालक हे दैनंदिन कामकाज पाहत नाही.
5. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी चळवळीवर नियंत्रण ठेवतात.
6. सहकारी संस्थेच्या आयुक्त व निबंधकाची नियुक्ती केंद्रशासन करते.
7. सहकार आयुक्त व निबंधक कठोर प्रशासक असावा.
8. सहकार आयुक्त व निबंधकांना न्यायनिवाडा करण्याचा अधिकार असतो.
9. सहकार आयुक्त व निबंधक राज्यातील सहकारी चळवळीचा सर्वोच्च अधिकारी असतो.
10. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्थेची नोंदणी करतात.
11. संस्थेच्या सभांचे इतिवृत्त लिहिण्याची जबाबदारी अध्यक्षांची असते.
12. सहकारी संस्थेच्या अध्यक्षास निर्णायक मताचा वापर करता येत नाही.
13. भागधारक हे सहकारी संस्थेचे सावकार असतात.
14. चालू ठेवीवर अधिविकर्ष सवलत मिळते.
15. महाराष्ट्रातील सहकारी संस्थांची नोंदणी सहकारी कायदा 1904 नुसार होते.
16. महाराष्ट्रातील पहिला सहकारी संस्था कायदा 1904 मध्ये पास झाला.
17. सभा चालू झाल्यानंतर गणपूर्तीची आवश्यकता नसते.

18. भागभांडवल हे भांडवल उभारणीचे बाह्य साधन आहे.
19. सहकारी संस्थेला राखीव निधी ठेवणे बंधनकारक आहे.
20. सहकारी संस्थेच्या दृष्टीने हिशेबतपासणी महत्त्वाची असते.
21. वैधानिक हिशेबतपासणीनंतर संस्थांना अंकेक्षण वर्ग देण्याची आवश्यकता नसते.
22. नागरी सहकारी बँका ग्रामीण भागात कार्य करतात.
23. नागरी सहकारी बँकेच्या कार्यात कोणत्याही समस्या नाहीत.
24. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची थकबाकी वाढत आहे.
25. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक प्राथमिक सहकारी संस्थेच्या कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवते.
26. महाराष्ट्रात अमरावती येथे पहिली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक स्थापन झाली.
27. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक राज्य स्तरावर कार्य करते.
28. राज्य सहकारी बँकेचे कार्यक्षेत्र देशभर असते.
29. राज्य सहकारी बँक शेतकऱ्यांना प्रत्यक्ष कर्जपुरवठा करते.
30. राज्य सहकारी बँक ही शिखर बँक आहे.
31. राज्यातील सहकारी चळवळीच्या विकासाची जबाबदारी शिखर बँकेवर असते.
32. भारतात सहकार शिक्षण प्रशिक्षणाची गरज नाही.
33. सहकार शिक्षण प्रशिक्षणामुळे सभासदामध्ये जागरुकता निर्माण होते.
34. सहकार शिक्षण प्रशिक्षणाने कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढते.
35. सहकार शिक्षण व प्रशिक्षणाची सभासदांना गरज नसते.
36. सहकार शिक्षण व प्रशिक्षणातून कुशल नेतृत्व निर्माण होते.
37. सहकारात नफ्यापेक्षा सेवेला अधिक महत्त्व दिले जाते.
38. स्पर्धात्मक बाजारपेठेत ग्राहकांना दुय्यम स्थान असते.

**प्रश्न.2 खालील संज्ञा / संकल्पना स्पष्ट करा.**

1. सभासद
2. संचालक
3. व्यवस्थापन समिती
4. क्रियाशील सभासद
5. नाममात्र सभासद
6. सहकार आयुक्त व निबंधक
7. उपविधी / पोटनियम

8. गणसंख्या
9. राखीव निधी
10. लाभांश
11. इतिवृत्त
12. सभा
13. अधिविकर्ष सवलत
14. हिशेबतपासणी
15. सहकार वर्ष
16. सभासद नोंदणी पुस्तक
17. ए.टी.एम.
18. सुरक्षित खण
19. नाबार्ड
20. शिखर बॅंक
21. सहकार शिक्षण
22. सहकार प्रशिक्षण
23. नवीन आर्थिक धोरण
24. बहुराष्ट्रीय कंपनी
25. जागतिक अर्थव्यवस्था
26. श्रमप्रधान उत्पादन तंत्र

**प्रश्न.3 खालील विधानांबाबत स्वमत लिहा.**

1. सहकार आयुक्त व निबंधक हा कठोर प्रशासक असावा.
2. सहकारी संस्था राखीव निधी उभारतात.
3. अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना सर्व सभासदांना दिलीच पाहिजे.
4. सहकारी संस्थांच्या दृष्टीने हिशेबतपासणी करणे सक्तीची असते.
5. सहकारी संस्थेच्या वैधानिक अंकेक्षणानंतर तिला अंकेक्षण वर्ग दिला जातो.
6. नागरी सहकारी बॅंकेच्या कार्यावर शहरी भागाचा आर्थिक विकास अवलंबून असतो.
7. नागरी सहकारी बॅंकेच्या कर्जपुरवठ्यामुळे स्वयंरोजगाराला चालना मिळते.

8. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कार्यावर जिल्ह्य़ातील सहकारी चळवळीचा विकास अवलंबून असतो.
9. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची वाढती थकबाकी ही गंभीर समस्या बनली आहे.
10. सहकारी संस्थेतील सभासदांना सहकार शिक्षणाची गरज आहे.
11. सहकार शिक्षण व प्रशिक्षणाने संस्थेतील कर्मचाऱ्यांच्या कामात उच्च कौशल्य व कार्यक्षमता प्राप्त होते.
12. सहकार चळवळीमध्ये राजकीय हस्तक्षेप वाढला आहे.
13. बहुराष्ट्रीय कंपन्याच्या तुलनेत सहकारी संस्थांचा उत्पादन खर्च जास्त आहे.

## प्रश्न 4. फरक स्पष्ट करा.

1. क्रियाशील सभासद आणि नाममात्र सभासद
2. सहयोगी सभासद आणि क्रियाशील सभासद
3. अध्यक्ष आणि सहकार आयुक्त व निबंधक
4. चालू ठेव आणि बचत ठेव
5. बचत ठेव आणि मुदत ठेव
6. अधिमंडळाची वार्षिक सभा आणि पहिली साधारण मंडळ सभा
7. पहिली साधारण मंडळाची सभा आणि अधिमंडळाची विशेष सभा
8. अधिमंडळाची वार्षिक सभा आणि अंतिम सभा
9. वैधानिक पुस्तके आणि बिगर वैधानिक पुस्तके
10. वैधानिक हिशेबतपासणी आणि अंतर्गत हिशेबतपासणी
11. नागरी सहकारी बँक आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक
12. राज्य सहकारी बँक आणि नागरी सहकारी बँक

## प्रश्न 5. टिपा लिहा.

1. सभासदांचे प्रकार.
2. सभासदत्व रद्द होण्याची कारणे.
3. सभासदांची पात्रता.
4. सहकार आयुक्त व निबंधकाची विकासात्मक कार्ये.
5. सहकार आयुक्त व निबंधकाचे अधिकार.
6. ठेवींचे प्रकार.
7. हिशेबतपासणीचे फायदे.

8. हिशेबतपासणी वर्गीकरण. ( ऑडिट वर्ग )
9. नागरी सहकारी बँकेची कार्ये.
10. नागरी सहकारी बँकेच्या समस्या.
11. नागरी सहकारी बँकेच्या समस्यावर उपाय.
12. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची कार्ये.
13. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या समस्या
14. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या समस्यावर उपाय.
15. राज्य सहकारी बँकेची कार्ये.
16. सहकार शिक्षण व प्रशिक्षणाची गरज.
17. सहकार क्षेत्रापुढील आव्हाने.

## प्रश्न 6. कारणे लिहा.

1. सभासद हे सहकारी संस्थेचे मालक असतात.
2. क्रियाशील सभासदाला मतदानाचा अधिकार असतो.
3. सभासद आपले प्रतिनिधी निवडतात.
4. सहकार आयुक्त व निबंधक कठोर प्रशासक असतो.
5. सहकार आयुक्त व निबंधक हे राज्यातील सहकारी चळवळीचे नियंत्रण करतात.
6. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्थेची नोंदणी रद्द करू शकतात.
7. सभेला गणसंख्येची आवश्यकता असते.
8. अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना सर्व सभासदांना दिलीच पाहिजे.
9. सहकारी संस्थांना राखीव निधी उभारणे बंधनकारक असते.
10. अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा प्रत्येक वर्षी बोलवावीच लागते.
11. सभेच्या अध्यक्षाला निर्णायक मताचा अधिकार असतो.
12. सहकारी संस्थेने वैधानिक पुस्तके ठेवणे बंधनकारक आहे.
13. सहकारी संस्थेच्या दृष्टीने हिशेबतपासणी महत्त्वाची असते.
14. हिशेबतपासणीसाकडून सहकारी संस्थेला अंकेक्षण वर्ग दिला जातो.
15. नागरी सहकारी बँकेची थकबाकी वाढत आहे.
16. जिल्हयातील सहकारी चळवळीचा विकास हा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कार्यावर अवलंबून असतो.
17. वाढती थकबाकी ही जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेपुढील गंभीर समस्या बनली आहे.
18. राज्य सहकारी बँक ही सहकारी पतपुरवठा रचनेतील सर्वोच्च बँक आहे.
19. राज्यातील सहकारी चळवळीचा विकास राज्य सहकारी बँकेच्या कार्यावर अवलंबून असतो.

## प्रश्न 7. खालील प्रश्न सोडवा.

1. सहकारी संस्थेचे सभासदत्व मंजूर केल्याचे पत्र.
2. सहकारी संस्थेच्या सभासदत्वाचा अर्ज नामंजूरीबाबतचे पत्र.
3. पहिली सर्वसाधारण मंडळ सभेची सूचना व कार्यक्रमपत्रिका तयार करा.
4. अधिमंडळाची वार्षिक सभेची सूचना व कार्यक्रमपत्रिका तयार करा.
5. सहकारी संस्थेने सभासदाला कर्ज मंजूर केल्याचे पत्र.
6. नियोजित सहकारी संस्थेसाठी नाव राखून ठेवण्याबाबत निबंधकास विनंती करणारे पत्र.
7. सहकारी संस्थेच्या नोंदणीसंबधी निबंधकास विनंती करणारे पत्र.
8. सहकारी संस्थेच्या पोटनियमातील दुरूस्तीस मान्यता देण्याबाबत निबंधकास विनंती करणारे पत्र.
9. सहकार आयुक्त व निबंधकाची नियंत्रणात्मक कार्ये लिहा.
10. सहकार आयुक्त व निबंधकाची वैधानिक कार्ये लिहा.
11. सहकार आयुक्त व निबंधकाची विकासात्मक कार्ये लिहा.
12. हिशेबतपासणीचे प्रकार स्पष्ट करा.
13. सहकार शिक्षण व प्रशिक्षणाची उद्दिष्टे विशद करा.
14. सहकार क्षेत्रापुढील आव्हाने लिहा.

## प्रश्न 8. दीर्घोत्तरी

1. सहकारी संस्थेच्या सभासदांचे अधिकार आणि जबाबदाऱ्या सविस्तरपणे स्पष्ट करा.
2. व्यवस्थापन समितीची कार्ये सविस्तरपणे स्पष्ट करा.
3. सहकारी संस्थेच्या भांडवल उभारणीची अंतर्गत साधने स्पष्ट करा.
4. सहकारी संस्थेच्या भांडवल उभारणीची बाह्य साधने सविस्तर स्पष्ट करा.
5. सभा म्हणजे काय ? सभांचे विविध प्रकार स्पष्ट करा.
6. महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा 1960 मधील सभेबाबतच्या कायदेशीर तरतुदी स्पष्ट करा.
7. सहकारी संस्थेची वैधानिक पुस्तके कोणती ते सविस्तर स्पष्ट करा.
8. महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा 1960 मधील हिशेबतपासणीबाबतच्या कायदेशीर तरतुदी स्पष्ट करा.